# दानीएल
# दानीएलना पुस्तक
## वळख

दानीएलनं पुस्तक बाबिलोनमा इस्राएल लोकसना बंदिवासना काळमा संदेष्टा दानीएलना जीवन अनी भविष्यसुचक दर्शनना संबधमा शे. हाई दानीएल अनी त्याना मित्रसना निष्ठाबद्दल तसंच राष्ट्र अनी जगनासंबधमा भविष्यवाणीबद्दल सांगस.पुस्तकमा ६०५ ते अंदाज ५३५ ई.सन पुर्व काळना समावेश शे, जठे दानीएल चार येगयेगळा बाबिलोन राजाना काळमा सेवा करेल व्हती. पारंपारिक मत असं शे की दानीएलनी या काळमा बाबिलोनमा पुस्तक लिखेल व्हतं, पण बराच विद्वानसना अस मत शे की ते इस्राएलमा २ शतकमा लिखामा वनंत. बाकीसना अस ईश्वास शे की पुस्तकना काही भाग येगयेगळा येळमा लिखाई जायेल शे.

दानीएलना पुस्तक बंदिवासमा राहनारा इस्राएली लोकसले तसच कठिण काळ येवावर भावी पिढीसले आशा देवाकरता लिखाई गयं. दानीएलना जीवनमाधलं घटनासद्वारा अनी भविष्यना संबंधमा भविष्यवाणीद्वारा, देव राजे अनी राष्ट्रसवर त्यानं सामर्थ्य दखाडस. बायबलना संबधमा संदर्भमा, हाई नवा करारमाधलं देवना राज्य समजी लेवाले मदत करस. ख्रिस्तबद्दल दानीएल ७:१३-१४ मा भविष्यवाणी करेल शे. शेवटना काळबद्दल दानीएलना दृष्टांत येशूनी नमुद करेल शे. मत्तय २४:१५; मार्क १३:१४ अनी योहानना प्रकटीकरणना संबंधित शेतस. दानीएल यिर्मयाना भविष्यवाणीसना सुध्दा ईचार करस. दानीएल ९:१-३

रूपरेषा

1. नबुखद्नेस्सरना काळमा बाबिलोनमा दानीएल अनी त्याना मित्रसबद्दक सांगेल शे १:४
2. राजा बेलशस्सरना दृष्टांतना अर्थ सांगेल शे ५
3. दारियासना काळमा सिंहना गुहामा दानीएलना बद्दल सांगस. ६
4. भविष्यमाधलं घटनासबद्दल देवकडतीन दानीएलले प्रकटीकरण शेतस 7:12

(अ) दानीएल भविष्यबद्दलना दोन दृष्टांतना अनी त्यासना अर्थना वर्णण करस.७:८

(ब) दानीएल त्याना लोककरता प्रार्थना करस अनी त्याले ग्राबीएल देवदूतनी उत्तर दिधं. ९

(क) ग्राबीएल भविष्यमाधलं घडामोडी, शेवटना काळबद्दल प्रकट करस १०:१२

## दानीएलना शिक्षण अनं त्याना सोबती
*(1:1-6)*

1 यहूदाना राजा यहोयाकीम याना कारकीर्दीना तिसरा वरीसले बाबेलना राजा
नबुखद्नेस्सर यानी यरूशेलमवर चढाई करीन त्याले वेढा दिधा.✡
2 देवनी यहूदाना राजा यहोयाकीम याले त्याना हातमा दिधं; त्याप्रमाणंच देवना
मंदिरमाधलं काही भांडीबी त्याना हातमा दिधं; त्यानी ती शिनार देशले आपला
दैवतसना घर आणात अनी आपला दैवतसना भांडारसमा ठेवात.
3 राजानी आपला *खोजासना नायक अश्पनज याले आज्ञा करी की इस्राएल
राजकुळसपाईन अनं सरदार घराणापाईन.
4 अव्यंग, सुरूप, सर्वा व्यवहारमा दक्ष, ज्ञानसपन्न, विद्यापारंगत अनी राजवाडामा
वागामा योग्य अश जवान माणसे लि येवानं अनी त्यासले खास्द्यासनी विद्या अनं
भाषा शिकाडानी.
5 राजा खाये त्या मिष्टअन्नमाईन अनी पिये त्या द्राक्षरसमाईन त्यासनं नित्य
खावानं पेवानं चालीन तीन वरीसपावत त्यासनं संगोपन व्हवाले पाहिजे; हाई मुदत
संपावर त्यासनी राजाना हुजूरमा येवानं, अशी राजानी आज्ञा करी.
6 ह्या जवान मंडळीसमा यहूदा वंशमाधला दानीएल, हनन्या, मीशाएल अनं
अजऱ्या ह्या व्हतात.
7 खोजासना सरदारनी त्यासले यानाप्रमाणं नाव दिधं दानीएलले बेलटशस्सर,
हनन्याले शद्रख, मीशाएलले मेशख अनं अजऱ्याले अबेदनगो.
8 राजा खाये ते मिष्टअन्न अनं पिये तो द्राक्षरस यासना आपलाले विटाळ व्हऊ
देवानं नही अश दानीएलनी मनना निश्चय करा; म्हणीन त्यानी खोजासना सरदारले
ईनंती करी की माले यासना विटाळ व्हवाले नको.
9 खोजासना सरदारनी दानीएलवर कृपा अनं दया व्हवाले पाहिजे अश देवनी
करं.
10 खोजासना सरदार दानीएलले बोलना, मना धनी राजा यानी तुमनं खाणपिण
नेमी ठेयेल शे; त्याना माले धाक शे तुमना वयना बाकीना जवानसपेक्षा तुमनं तोंड
उतरेल त्याले कशाले दखावाले पाहिजे? राजानापुढे मन डोकं उडाई जावाना येळ
तुम्हीन काबंर आणानं?

✡ **1:1 1:1** २ राजे 24:1-2; २ इतिहास 36:5 * **1:3 1:3** षंड

11 तवय मुख्य खोजासना सरदार अश्पनज, जो दानीएल, हनन्या, मीशाएल,
अनं अजऱ्या यासनावर जो कारभारी नेमेल व्हता त्याले दानीएलनी सांगं,
12 मी इनंती करस की, दहा दिन आपला ह्या दाससवर एवढा प्रयोग करीन दखं,
आमले खावाले शाकान्न अनं पेवाले नुसतं पाणी दे फक्त.
13 मंग आमनं तोंड दख; अनी राजघरना अन्न खानारा जवानसनाबी तोंड दख;
मंग तुना नजरमा ई तसं तुना ह्या दाससना कर.
14 त्यानी त्यासनी हाई ईनंती ऐकीन दहा दिन त्यासनावर हाऊ प्रयोग करा.
15 दहा दिननंतर राजघरना अन्न खानारा सर्वा जवानसपेक्षा त्यासनं चेहरा
अधिक चांगला दिसना त्या आंगमाबी अधिक जाडजुड व्हयनात.
16 तवय तो कारभारी त्यासले नेमेल अन्न अनं द्राक्षरस देवानं बंद करीन त्यासले
शाकान्न देवाले लागना.
17 या चारी जवानसले देवनी सर्व विघा अनं ज्ञान यामा योग्य अनं चतुर करा;
दानीएल हाऊ सर्वा दृष्टांत अनं स्वप्नं यासना उलगडा करामा ज्ञानी व्हयना.
18 नबुखद्रेस्सर राजानी त्यासले आपलासमोर हजर करानी मुदत ठरायेल व्हती
ती संपावर खोजासना सरदारनी त्यानासमोर त्यासले हजर करं.
19 तवय राजानी त्यासनासंगे भाषण करा; त्या सर्वासमा दानीएल, हनन्या,
मीशाएल अनं अजऱ्या यासना तोडींना कोणी दुसरा दखावामा वना नहीं; म्हणीन
त्या राजाना सेवामा रावाले लागनात.
20 ज्ञानना अनं बुध्दीना बाबतमा राजा त्यासले जे काही ईचारे त्यामा त्या त्याना
सर्वा राज्यमा असेल सर्वा ज्योतिषीसपेक्षा अनं मांत्रिकसपेक्षा दसपट हुशार शेतस
अश त्याले दखाई जाये.
21 दानीएल हाऊ बाबेल राजदरबारमा कोरेश राजाना काळना पहिला
वरीसपावत तठे राहिना.

# 2

## दानीएल नबुखदनेस्सरनना स्वप्नना अर्थ सांगस

1 नबुखद्रेस्सर राजाले त्याना काळना दुसरा वरीसले स्वप्न पडनं, त्यानामुये
त्याना मनले तळमळ लागनी अनी त्यानी झोप उडनी.
2 तवय राजानी हुकूम करा की मन स्वप्न काय शेतस ते सांगाले ज्योतिषी,
मांत्रिक, जादूगार अनं खास्दी यासले बलाईन आणा; मंग त्या सर्वा राजानासमोर
हजर व्हयनात.

3 राजा त्यासले बोलना, "माले पडेल स्वप्न समजाकरता मना मनले तळमळ
लागनी शे.
4 त्या खास्दी, अरामी भाषामा राजाले बोलनात, महाराज, सर्वकाळ जिवत
राव्हा; आपले स्वप्न आपला ह्या दाससले सांगा, म्हणजे आम्हीन त्याना अर्थ
सांगसूत.
5 राजानी खास्दीसले बोलना, मना ठराव व्हई जायेल शे की मना स्वप्न अनं
त्याना अर्थ हाई माले तुम्हीन सांगात नही तर तुमना तुकडातुकडा करीन तुमना घरं
उकिरडं करानं;
6 पण तुम्हीन स्वप्न अनं त्याना अर्थ माले सांगशात तर तुमले मनाकडतीन
देणग्या, इनाम अनं मोठा मान भेटी; पण स्वप्न अनं त्याना अर्थ माले सांगा.
7 त्या परत त्याले बोलनात, महाराजनी आपलं स्वप्न आपला दाससले सांगानं
म्हणजे आम्हीन त्याना अर्थ सांगसूत.
8 तवय राजा बोलना, माले खात्रीतीन वाटी ऱ्हायनं की तुम्हीन येळ काढी
राहिनात शेतस, कारण तुमले ठाऊक शे की, मना ठराव व्हई जायेल शे.
9 तुम्हीन माले स्वप्न सांगावूत नही तर तुमना संबधमा एकच हुकूम व्हई; हाऊ
प्रसंग टळी जावाले पाहिजे म्हणीन तुम्हीन खोटानाटा गोष्ट सांगानं बेत करेल शे.
मना स्वप्न माले सांगा म्हणजे त्याना अर्थ तुमले सांगता ई किंवा नही हाई माले
समजी.
10 खास्दीसनी राजाले उत्तर दिधं, महाराजनी हाई गोष्ट सांगी असा कोणी
माणुस सर्वा दुनियामा नही; अशी गोष्ट ज्योतिष्यसले, मांत्रिकसले किंवा खास्दीसले
कोणीबी थोर अनं पराक्रमी राजानी आजपावत ईचारी नही.
11 महाराज जी गोष्ट ईचारतस ती कठीण शे; मानवमा वास न करनारा
देवनाशिवाय कोणाचघाई ती महाराजसना हुजूरसले सांगता येवाव नही.
12 हाई ऐकीन राजा क्रोधतीन संतापना अनी बाबेलना सर्वा ज्ञानीसना वध कराना
अशी त्यानी आज्ञा करी.
13 ज्ञानीसना वध कराना हाऊ हुकूम सुटना, तवय दानीएलना अनं त्याना
सोबतीसना वध कराना म्हणीन लोक त्यासले शोधाले लागनात.

## परमेश्वरानाद्वारा दानीएलले अर्थ प्रकट करणं

14 राजाना गारघासना नायक अर्योक हाऊ बाबेलसना ज्ञानीसना वध कराले
निंघेल व्हता, त्यानासंगे दानीएलनी चातुर्यतीन अनं सुज्ञतीन भाषण करं.

15 त्यानी राजाना सरदार अर्योक याले सांगं, अशी कडक राजाज्ञा काबंर शे?
तवय अर्योकनी दानीएलले ती बातमी सांगी.
16 मंग दानीएलनी राजाकडे जाईन ईनंती करी की, माले येळ द्या म्हणजे मी
हुजूरले स्वप्नना अर्थ सांगसु.
17 यावर दानीएलनी आपला घर जाईन आपला सोबतीसले हनन्या, मीशाएल
अनं अजऱ्या यासले हाई बातमी सांगी.
18 अनी बाबेलना इतर ज्ञानीसबरोबर आपला अनं आपला सोबतीसना घात
व्हवाले नको म्हणीन दानीएलनी त्यासले ईनंती करी की, हाई रहस्यासंबंधतीन
स्वर्गना देवनी आपलावर दया कराले पाहिजे अश त्यानाजोडे मांगानं.
19 तवय ते कोड दानिएलले रातना येळले दर्शनना द्वारा प्रगट व्हयना; त्यानावरीन
दानीएलनी स्वर्गना देवना धन्यवाद करा.
20 दानीएल बोलना, देवना नाव युगानुयुग धन्यवादित राहो; कारण ज्ञान अनं
बल हाई त्यानाच शेतस;
21 तोच प्रसंग अनं समय बदलस; तो राजासले स्थानापन्न किंवा स्थान भ्रष्ट
करस; तो ज्ञानीसले ज्ञान देस अनं बुध्दिमानसले बुध्दि देस.
22 तो गहन अनं गूढ गोष्टी प्रगट करस; अंधारमा काय शे हाई त्याले ठाऊक
ऱ्हास; त्यानाजोडे प्रकाश वसस.
23 हे मना पुर्वजसना देवा, मी तुना उपकार मानस अनं तुना स्तवन करस की तू
माले ज्ञान अनं बल हाई देल शेतस अनी ज्यानाकरता आम्हीन तुले ईचारं ते तू माले
आते समजाडेल शे; तू आमले राजानी गोष्ट सांगेल शे.

## राजाले स्वप्नना अर्थ सांगनं

24 यानावर दानीएल, ज्या अर्योकले राजानी बाबेलना ज्ञानी पुरूषसना वध
कराले नेमेल व्हतं त्यानाकडे जाईन बोलना, बाबेलना ज्ञानीसना वध करू नका;
माले महाराजनापुढे न्या म्हणजे मी त्यासले स्वप्नना अर्थ सांगस.
25 तवय अर्योकनी दानीएलले लगेच राजाकडे लई जाईसन सांगं, राजानं
स्वप्नना अर्थ सांगनारा असा एक पुरूष कैद करीन आणेल यहूदीसमा माले आढळेल
शे.
26 बेलटशस्सर हाई नाव मिळेल दानीएलले राजानी सांगं, मी जे स्वप्न दखं ते
अनं त्याना अर्थ माले सांगाले तू समर्थ शे का?
27 दानीएलनी राजाले उत्तर दिधं की, सरकारनी जे कोड ईचारेल शे ते ज्ञानी,
मांत्रिक, ज्योतिषी अनं दैवज्ञ यासले राजाले सांगता येवावू नही.

28 तरी कोड प्रगट करनारा देव स्वर्गमा शे अनी त्यानी पुढला काळमा काय
व्हवाव शे हाई नबुखदनेस्सर महाराजले सांगेल शे. आपलं स्वप्न, आपण बिछानामा
पडेल व्हतात तवय आपलाले व्हयेल दृष्टांत असा शे.
29 महाराज आपली गोष्ट अशी शे की, यानापुढे काय घडणार शे हाई ईचार
आपण बिछानामा पडेल व्हतात आपला मनमा वनं की यानापुढे काय व्हई, हाई
कोड प्रगट करनारा देवनी आपलाले सांगेल शे.
30 आते मनी गोष्ट अशी शे की, हाई कोड माले प्रगट व्हयेल शे ते मी काही
बाकीना माणसंपेक्षा अधिक बुध्दिमान शे म्हणीन नही, तर महाराजले स्वप्नना अर्थ
प्रगट व्हवाले पाहिजे अनं आपलाले आपला मनमाधलं ईचार समजावं म्हणीन
व्हयेल शे.
31 महाराज, आपण दृष्टांत दखा त्यामा एक मोठा पुतळा आपला नजरमा पडना.
हाऊ पुतळा भव्य अनं चमकदार असा आपलापुढे उभा व्हता; त्यानं रूप विक्राळ
व्हतं.
32 त्या पुतळानं शीर उत्तम सोनानं, त्यानी छाती अनं हात रूपानं, त्यानं पोट
अनं मांडया पितळन्या,
33 त्यानं पाय लोखंडना अनं त्याना पावलसना काही भाग लोखंडना अनं काही
भाग मातीना व्हता.
34 आपन स्वप्न दखी राहिंतात तवय कोनाच हात न लागता, एक पाषाण
आपोआप सुटना अनं त्या पुतळाना लोखंडी अनं मातीना पावलसवर आदळीन
त्यासनं फुटीन तुकडातुकडा व्हयनात.
35 तवय लोखंड, माती, पितळ, रूपं अनं सोनं यासनं चुरा व्हईन उन्हाळ
खळामाधलं भुसानामायक ती व्हयनी. वारानी ती उधळीन लिधं; त्यासना मागबी
राहिना नही; त्या पुतळावर आदळेल पाषाणना एक मोठा पर्वत व्हईन त्यानी सर्व
पृथ्वी व्यापी टाकी.
36 हाईच आपलं स्वप्न, आते याना अर्थ राजाना हुजूरले आम्हीन सांगस.
37 महाराज, आपण राजाधिराज राहिसन आपलाले स्वर्गना देवनी राज्य,
पराक्रम, बल, अनं वैभव हाई देल शेतस;
38 अनी जठेजठे मनुष्यजातीना निवास शे, तठला वनपशु अनं आकाशमाधला
पक्षी त्यानी आपला अधीन करेल शेतस, त्या सर्वासवर आपण सत्ता ठेयेल शे,
सुवर्णना शीर आपणच शेतस.
39 आपलानंतर आपलापेक्षा कनिष्ट अस राज्य उत्पन्न व्हई; अनी पितळनं अस
तिसरं राज्य व्हई; ते सर्वा पृथ्वीवर सत्ता चालाडी.

40 चौथा राज्य लोखंडसारखं मजबूत व्हई; लोखंड सर्वासना भुगाभुगा करस
तसं ते राज्य चुर्ण करनारा लोखंडनासारखं सर्वासना चुर्ण करी.
41 आपण त्या पुतळानं पावलं अनं पावलसना बोटे दखात; त्यासना काही भाग
कुंभारना मातीना अनं काही भाग लोखंडना व्हता; तसं हाई राज्य व्दिविध व्हई;
तरी मातीमा लोखंड मिसाळेल आपण दखात तश त्या राज्यमा लोखंडनी मजबुती
राही.
42 त्या पुतळानं पावलंसना बोटे काही भाग लोखंडना अनं काही भाग मातीना
व्हतं; तसं ते राज्य अंशत: बळकट अनं अंशत: दुर्बळ असं व्हई.
43 लोखंड मातीनासोबत मिसळेल आपण दखात, तसं त्या राज्यमाधलं लोके
इतर लोकसनाबरोबर संबंध जोडतीन, पण जसं लोखंड मातीनाबरोबर एकत्र व्हस
नही, तसं त्याबी त्यासनाबरोबर एकत्र व्हवावूत नहीत.
44 त्या राजासना काळमा स्वर्गना देव एक राज्यनी स्थापना करी, त्याना कधी
भंग व्हवाव नहीं; त्यानं प्रभुत्व दुसराना हातमा कधीच जावाव नहीं; तर ते या सर्वा
राज्यसना चुर्ण करीन त्यासले नष्ट करी अनं ते सर्वकाळ टिकी.
45 आपण स्वप्नमा अश दखं की कोणाच हात न लागता त्या पर्वतपाईन एक
पाषाण आपोआप सुटना अनी त्यानी लोखंड, पितळ, माती, रूपं अनं सोनं यासनं
चुर्ण करात त्यानावरीन पुढं काय व्हवाव शे हाई त्या थोर देवनी महाराजसना हुजूरले
समजाडेल शे; हाईच आपलं स्वप्न, अनं त्याना अर्थबी नि:संशय हाऊच शे.

### राजानाद्वारा दानीएलना सन्मान

46 तवय नबुखदनेस्सर राजानी पालथं पडीसन दानीएलले साष्टांग नमस्कार
घालात अनी त्यानापुढे नैवेद्य ठेईन त्याले धूप दाखाडा अशी आज्ञा करी.
47 राजानी दानीएलले सांगं, तुमना देव खरोखरच देवाधिदेव अनं राजराजेश्वर
शे अनी तुले हाई कोड प्रगट करता वन म्हणीन तो कोड प्रगट करनारा देव शे.
48 मंग राजानी दानीएलले मोठा पदवर चढायं, त्याले मोठमोठी इनाम दिधी,
त्याले सर्वा बाबेल परगण्यानी सत्ता दिधी अनी त्याले बाबेलना सर्वा ज्ञानीसना
प्रमुखसना अध्यक्ष करात.
49 राजानी दानीएलना ईनंतीवरीन शद्रख, मेशख अनं अबेदनगो यासले बाबेल
परगण्यासना कारभार सांगात; पण दानीएल राजदरबारमा राहे.

# 3

### तप्त भट्टीमाईन सुटका

1 नबुखदनेस्सर राजानी सुवर्णानी एक मूर्ति बनाडी, तिनी उंची साठ हात अनं
रूंदी सहा हात व्हती; तिनी स्थापना त्यानी बाबेल परगणामाधलं दूरा नावना मैदानमा
करी.
2 हाई जी मूर्ती नबुखदनेस्सर राजानी स्थापेल व्हती तिनी प्रतिष्ठा कराकरता
त्यानी राजप्रतिनिधी, नायब अधिपति, सरदार, मंत्री, भांडारी, न्यायपंडित,
न्यायाधीश अनं प्रांतसना सर्वा अधिकारी यासनी एकत्र जमानं म्हणीसन त्यासले
बोलावनं करात.
3 तवय राजप्रतिनिधी, नायब अधिपति, सरदार, मंत्री, भांडारी, न्यायपंडित,
न्यायाधीश अनं प्रांतसना सर्वा अधिकारी ह्या नबुखदनेस्सर राजानी स्थापन करेल
मूर्तीनी प्रतिष्ठा कराकरता एकत्र जमनात अनी तिनासमोर उभा राहिनात.
4 मंग एक घोषणा करनारानी मोठा आवाजतीन भाषण करा की, अहो लोकसवनं,
येगयेगळा राष्ट्रमाधला येगयेगळा भाषा बोलनारा लोकसवनं, तुमले आज्ञा व्हई
राहिनी शे की,
5 शिंग, बासरी, सतारी, सारंगी, वीणा पुंगी वगैरे वाघसना आवाज तुमना कानमा
पडताच नबुखदनेस्सर राजानी जी सुवर्णमूर्ती स्थापेल शे तिनापुढे तुम्हीन साष्टांग
दंडवत घालानं;
6 जो कोणी तिले साष्टांग दंडवत घालावु नही त्याले तवळच धगधगीत आग्नीना
भट्टीमा टाकतीन,
7 यानाकरता शिंग, बासरी, सतार, सारंगी, वीणा वगैरे वाघसना आवाज
कानमा पडताच येगयेगळा राष्ट्रमाधला येगयेगळा भाषा बोलनारा सर्वा लोकसनी
नबुखदनेस्सर राजानी स्थापेल करेल त्या सुवर्णमूर्तीपुढे साष्टांग दंडवत घालात.

## दानीएलना तीन सोबतीसवर आज्ञा मोडानं आरोप

8 यावर बराच खास्दीसनी राजाकडे जाईन यहूदीसवर आरोप करात.
9 त्या नबुखदनेस्सर राजाले बोलनात, महाराज, सर्वकाळ जिवत राव्हा.
10 महाराज, आपण हुकूम करा की, शिंग, बासरी, सतार, सारंगी, वीणा, पुंगी
वगैरे वाघसना आवाज ज्या ज्या मनुष्यना कानमा पडी त्यानी सुवर्णमूर्तीपुढे साष्टांग
दंडवत घालानं;
11 अनी जो कोणी साष्टांग दंडवत घालावु नही त्याले धगधगीत आग्नीना भट्टीमा
टाकानं;

12 पण आपण बाबेल परगणावर नेमेल शद्रख, मेशख, अबेदनगो या नावना
कोणी यहूदी शेतस त्यासनी, महाराज, आपली पर्वा करी नही; त्या आपला देवसना
उपासना करतस नही अनी आपण स्थापेल करेल सुवर्ण मूर्तीनी पूजा करतस नही.
13 हाई ऐकीन नबुखदनेस्सर क्रोधतीन संतापना अनी शद्रख, मेशख, अबेदनगो
यासले लई येवानी आज्ञा करी. तवय लोकसनी त्यासले राजानापुढे आण.
14 नबुखदनेस्सर त्यासले बोलना, अरे शद्रख, मेशखा, अबेदनगो, तुम्हीन मना
देवसनी उपासना करतस नही अनं मी स्थापन करेल सुवर्णमूर्तीनी पूजा करतस नही,
अस तुम्हीन मुद्दाम करतस का?
15 आते शिंग, बासरी, सतार, सारंगी, वीणा, पुंगी वगैरे वाद्यासना आवाज
ऐकताच मी करेल मूर्तीपुढे तुम्हीन साष्टांग दंडवत घालनात तर बरं; नही घालनात
तर तुमले धगधगीत आग्नीना भट्टीमा लगेच टाकामा ई; मना हाततीन तुमले सोडाई
अस कोणता देव शे?
16 शद्रख, मेशख अनं अबेदनगो यासनी राजाले उत्तर दिधं की, महाराज, या
बाबतमा आपलाले उत्तर देवानं आमले आवश्यकता दखास नही.
17 ज्या देवनी आम्हीन उपासना करतस तो आमले धगधगीत आग्नीना भट्टीमाईन
सोडावाले समर्थ शे; महाराज, तो आमले आपला हातमाईन सोडाई.
18 ते कसबी राहो, पण महाराज, हाई पक्क समजानं की, आम्हीन आपला
दैवतसना उपासना करावुत नही अनी आपण स्थापन करेल सुवर्णमूर्तीले दंडवत
घालावुत नही.

## दानीएलना तीन सोबतीसले भट्टीमा टाकनं

19 हाई ऐकीसन नबुखदनेस्सर राजा संतापना; शद्रख, मेशख अनं अबेदनगो
यासनासंबंधतीन त्यानी मुद्रा पालटनी अनी त्यानी आज्ञा करी की, भट्टी पहिलापेक्षा
सातपट तप्त करा.
20 मंग त्यानी आपला सैन्यमातीन काही बलवान पुरूषसले आज्ञा करी की,
शद्रख, मेशख अनं अबेदनगो यासन्या मुसक्या बांधीन त्यासले त्या तप्त आग्नीना
भट्टीमा टाका.
21 तवय त्या पुरूषसले त्यासनं पायमोजे, झगे वगैरे कपडासहित बांधीन
धगधगीत आग्नीना भट्टीमा टाकात.
22 राजानं हुकूम पक्का कडक रावामुये ती भट्टी भलती तप्त करेल व्हती; म्हणीन
ज्या पुरूषसनी शद्रख, मेशख अनं अबेदनगो यासले तिनावर आणात त्या जाळतीन
भाजीसन मरनात.

23 शद्रख, मेशख अनं अबेदनगो ह्या तिन्ही पुरूष मुसक्या बांधेल असं त्या
धगधगीत आग्नीना भट्टीमा पडनात.
24 नंतर नबुखदनेस्सर राजा चकित व्हईन पटकन उठना; तो आपला मंत्रीले
बोलना, आपण आग्नीमा तिन जणसले बांधीन टाकात ना? त्यासनी राजाले उत्तर
दिधं, हा सरकार, खरे शे.
25 तो बोलना, दखा! चार पुरूष आग्नीमा मोकया फिरी राहिना शेतस असं
माले दखास; त्यासले काहीएक इजा पोहचेल नही; चौथानं स्वरूप तर एखादं
देवपुत्रनासारखं शे.

### दानीएलना तीन सोबतीसना सन्मान

26 मंग नबुखदनेस्सर त्या धगधगीत आग्नीना भट्टीना दारनाजोडे ईसन बोलना,
अहो शद्रख, मेशख अनं अबेदनगो, परात्पर देवना सेवकहो, आग्नीमाईन बाहेर या.
तवय शद्रख, मेशख अनं अबेदनगो आग्नीमाईन बाहेर वनात;
27 अनी राजप्रतिनिधी, नायब अधीपति, सरदार अनं राजमंत्री ज्या तठे जमेल
व्हतात त्यासनी या पुरूषासले दखा तवय त्यासना शरीरवर आग्नीना परिणाम व्हयेल
नव्हता, त्यासना डोकाना एक केसबी बळेल नव्हता, त्यासना पायमोजाले काही
व्हयेल नव्हतं अनी आग्नीना गंधबी त्यासले लागेल नव्हता.
28 तवय नबुखदनेस्सर बोलना, शद्रख, मेशख अनं अबेदनगो यासनी आपला
देववर भाव ठेवा, राजानं शब्द मोडात, आपला देवाशिवाय अन्य देवनी सेवा अनं
उपासना करानी नही म्हणीन त्यासनी आपलं देह अर्पण करा, त्यासले त्यासना देवनी
आपला देवदूत धाडीसन सोडायेल शे; त्याना धन्यवाद असो.
29 यानाकरता मी फर्मावस की, सर्वा लोके, प्रत्येक राष्ट्रना अनं प्रत्येक भाषा
बोलनारा लोके, यासनापाईन जे कोणी शद्रख, मेशख अनं अबेदनगो यासना
देवनाविरूध्दमा काही बोलतीन त्यासनं तुकडा तुकडा करामा येतीन; त्यासना घरना
उकिरडा करामा येतीन; कारण अश प्रकारंमा सोडावाले समर्थ दुसरा कोणी देव नही.
30 नंतर राजानी शद्रख, मेशख अनं अबेदनगो यासले बाबेल परगणमा मोठी
जागमा नेमा.

# 4

### नबुखदनेस्सरनं दुसरं स्वप्न

1 नबुखदनेस्सर राजा याजकडतीन सर्वा पृथ्वीवर राहनारा सर्वा लोकसले. सर्वा
राष्ट्रसना अनं सर्वा भाषा बोलनारा लोकसले: तुमले शांती भेटो!

2 परात्पर देवनी जी चिन्ह अनं जे अद्भुत चमत्कार मनासंबधमा दखाडेल शे ती
प्रगट करानं हाई माले बरं वाटेल शे.
3 त्यानं चिन्ह कितलं मोठं शेतस! त्याना अद्भुत चमत्कारना प्रभाव केवढा!
त्यानं राज्य सर्वकाळनं शे अनं त्यानं प्रभुत्व पिढ्यापिढ्या राहनारं शे.

4 मी नबुखदनेस्सर आपला घरमा आनंदमा व्हतु, आपला मंदिरमा समृध्द व्हतु.
5 मी स्वप्न दखा त्यानाघाई मी भयभीत व्हयनु; मी पलंगवर पडेल व्हतु तवय
मना ईचार अनं मना मनमा घोळत राहनारा कल्पना यासनाघाई मी चिताक्रांत व्हयनु.
6 तवय मी आज्ञा करी की, माले स्वप्नना अर्थ सांगाकरता बाबेलमाधलं सर्वा
ज्ञानी पुरूषसले मनाजोडे आणानं.
7 तवय ज्योतिषि, मांत्रिक, खास्दी अनं दैवज्ञ ह्या वाडामा येवावर मी आपलं
स्वप्न त्यासनापुढे मांडात; पण त्यासनी त्याना अर्थ माले सांगं नही.
8 सरतेशेवटी दानीएल मनापुढे वना; त्यानं मना देवना नाववरीन बेलटशस्सर
हाई नाव ठेयेल शे अनं त्याना ठायी पवित्र देवना आत्मा वसी राहिना शे; त्याले मी
आपलं स्वप्न सांगं.
9 मी बोलनु, हे बेलटशस्सर, ज्योतिषसना अध्यक्षा, पवित्र देवना आत्मा तुना
ठायी शे अनं कोणतबी कोड तुले समजाले अवगड नही हाई माले ठाऊक शे, तर
मी दखेल स्वप्नामाधलं दृष्टांत अनं त्याना अर्थ माले सांग.

10 मी आपला पलंगवर पडेल व्हतु तवय मना मनमा जे दृष्टांत घोळी रांहितं ते
हाई: मी दखं, तो पृथ्वीना मध्यभागमा एक झाड व्हता, त्यानी उंची भलती मोठी
व्हती.
11 तो झाड वाढीन मजबूत व्हयना, त्यानी उंची आकाशमा पोहचनी अनं तो
सर्वा पृथ्वीना दिगंतापावत दखावाले लागना.
12 त्याले सुंदर पाने व्हती, त्यानावर फळं भरपुर राहिसन सर्वासले खावाले
पुष्कळ व्हती. वनपशु त्याना आश्रयतीन राहेत, आकाशमाधला पक्षी त्याना
फांघासमा वस्ती करेत, अनं त्या झाडवर सर्वा प्राणीसना पोषण व्हत राहे.
13 मी पलंगवर पडनु व्हतु तवय मना मनमा दृष्टांत घोळी राहिंतात, त्यामा मी
दखं की, एक जागल्या, पवित्र देवदूत, आकाशमाईन उतरना.
14 तो मोठा आवाजतीन बोलना, हाऊ झाड तोडी टाका, ह्याना फांघा ढाळी
टाका, ह्याना पाने झाडी टाका अनं ह्याना फळं विखरी टाका; ह्याना खाल राहनारा
पशु निंघी जावोत अनं पक्षी ह्याना फाघांसमाईन उडी जावोत.

15 तरी पण ह्यानं बुंध जमीनमा राहू द्या; याले लोखंड अनं पितळ याना पट्टाघाई
बांधीन रानमाधलं कोवळा गवतमा राहू द्या; याले आकाशमाधलं दवतीन भिजू द्या;
भूमीवरना गवतना वाटा याले वनपशुबरोबर भेटो;
16 यानं मानवहृदय जाईसन याले पशुहृदय प्राप्त होवो अनं सात काळ त्यानावरीन
जावोत.
17 हाई शासन त्या जागल्याना ठरावाप्रमाणं अनं पवित्र जणसना वचननुसार
व्हयनं; ते अशाकरता की, मानवी राज्यसवर देवनी सत्ता शे, अनं तो ती पाहिजे
त्यासले देस अनी त्यानावर अगदी हलका प्रतिना मनुष्यपाईन पाहिजे त्याले नेमस,
हाई सर्वा जीवधारीसले समजावं.
18 हाई स्वप्न मी नबुखद्नेस्सर राजानी दखेल शे; तर आते हे बेलटशस्सरा, याना
अर्थना उलगडा कर, कारण मना राज्यमाधलं सर्वा ज्ञानी पुरूषसले याना अर्थ माले
सांगता वन नहीं; पण तुले सांगता ई, कारण पवित्र देवना आत्मा तुना ठायी शे.

### दानीएल स्वप्नना अर्थ सांगस

19 मंग बेलटशस्सर हाई नाव दियेल दानीएल काही येळ ईचारमा पडना अनं
ईचारसघाई त्यानं मन व्याकूळ व्हयनं. तवय राजा त्याले बोलना, बेलटशस्सरा,
हाऊ स्वप्नसंबंधमा अनं त्याना अर्थसंबंधमा तू घाबरू नको, तवय बेलटशस्सरनी
सांगं, मना स्वामी, हाई स्वप्न तुना द्वेषासले अनं त्याना अर्थ तुना वैरीसले लागू
व्हवाले पाहिजे.
20 तू झाड दखा, तो वाढीन मजबूत व्हयना, त्यानी उंची आकाशमा पोहचनी,
तो सर्वा पृथ्वीले दखावाले लागना;
21 त्याना पाने सुंदर व्हती, त्यानावर फळं भरपुर राहीन सर्वासले खावाले पुष्कळ
व्हती, त्याना खाल वनपशु राही राहिंतात अनं त्याना फांद्यासमा आकाशमाधला पक्षी
वस्ती करी राहितात.
22 हे राजा, तो झाड तूच शे; तू वाढीन बलवान व्हयेल शे; तुनी थोरवी वाढीन
आकाशपावत पोहचेल शे.
23 एक जागल्या, पवित्र देवदूत, आकाशमाईन उतरीन बोलना, हाऊ झाड
तोडीन याना नाश करा; पण ह्याना बुंध जमीनमा राहू द्या; ह्याले लोखंड अनं पितळ
यासना पट्टाघाई बांधीन रानमाधला कोवळा गवतमा राहू द्या; ह्याले आकाशमाधला
दवतीन भिजू द्या; ह्याले वनपशुबरोबर वाटा भेटो, यानावरीन सात काळ जावोत
तोपावत असं होवो, अश राजानी दखेल शे.

24 हे राजा, याना अर्थ असा शे अनी मना स्वामी राजा, यानाविषयी परात्पर
देवना हाऊ ठराव शे.
25 तुले मनुष्यमातीन घाली देतीन; तुनी वस्ती वनपशुमा व्हई; तुले बैलनामायक
गवत खाण पडी; तू आकाशमाधला दवतीन भिजशी; मानवी राज्यावर परात्पर देवनी
सत्ता शे अनं तो ती पाहिजे त्यासले देस हाई ज्ञान तुले व्हवापावत तुनावरतीन सात
वर्ष जातीन.
26 त्यासनी त्या झाडनं बुंध राखी ठेवाले सांगं, याना अर्थ हाऊ शे की, सत्ता
हाई स्वर्गना देवनी शे हाई ज्ञान तुले व्हयनं म्हणजे तुनं राज्य निश्चितमा तुले भेटी.
27 म्हणीन हे राजा, मनी ईनंती तू मान्य करानी; तू पाप सोडीन धर्माचरण करानं;
अधर्म सोडीन गरीबसवर दया करानी; अशामा कदाचित तुनं स्वास्थ्य अधिक वर्ष
राही.
28 हाई सगळं नबुखद्नेस्सर राजा यानावर गुजरनात.
29 बारा महिना लोटावर तो एकदाव बाबेलना राजवाडाना गच्चीवर फिरी
राहिंता.
30 त्या येळले राजा बोलना, हाई मोठं बाबेल नगर राजनिवासकरता मनाच
पराक्रमतीन अनं मनाच प्रतापना वैभवकरता मी बांधेल शे ना!
31 हाई शब्द राजाना मुखमाईन निंघस नही निंघस तवळच आकाशवाणी व्हयनी
की, हे नबुखद्नेस्सरा, हाई तुले विदित होवो की तुनी हातनी राजसत्ता जायेल शे.
32 तुले मनुष्यमाईन घाली देतीन; तुनी वस्ती वनपशुसमा व्हई; तुले बैलनामायक
गवत खाणं पडी; अनी मानवी राज्यावर परात्पर देवनी सत्ता शे अनं तो ती पाहिजे
त्याले देस हाई ज्ञान तुले व्हस तोपावत तुनावरीन सात वर्ष जातीन.
33 त्याच येळमा हाई नबुखदनेस्सरना प्रत्ययमा वनं; त्याले मनुष्यमातीन घाली
दिधं अनं तो बैलनागत गवत खावाले लागना; त्यानं शरीर आकाशमाधला दवतीन
भिजाले लागना; आठपावत की त्याना केस गरूडना पिसंप्रमाणं वाढाले लागनं अनी
त्याना नखे पक्षीसना नखेसनासारखं व्हयनात.

## नबुखद्नेस्सरनाद्वारा परमेश्वरनी स्तुती

34 ह्या सात वरीस संपनात तवय मी राजा नबुखद्नेस्सरनी आपला डोया
आकाशकडे लावात; मनी बुध्दि माले परत वनी; मी परात्पर देवना धन्यवाद करा,
त्या सर्वकाळ जिवत राहनारा देवना स्तवन करा अनं त्यानी महिमा करी; कारण
त्यानं प्रभुत्व सर्वकाळनं शे, अनी त्यानं राज्य पिढ्यानपिढ्या राहनारा शे.

35 पृथ्वीवरना सर्वा रहिवासी फक्त पदार्थ शेतस; तो आकाशमाधला सैन्यासना
अनं पृथ्वीवरला रहिवासीसना त्याना इच्छामा ई तसं करस; तू असं काबंर करस,
असं त्याना हात धरीन कोणाघाईच त्याले सांगावस नही.
36 त्याच येळले मनी बुध्दि माले परत वनी; मना राज्यना वैभवना मना प्रताप
अनं तेज हाई माले परत प्राप्त व्हयनं; मना मंत्री अनं सरदार मना भेटले वनात; मी
आपला राज्यमा स्थापित व्हयनु; अनं माले अत्यंत मोठी थोरवी प्राप्त व्हयनी.
37 आते मी नबुखद्नेस्सर स्वर्गना राजानं स्तवन करस, त्याना जयजयकार करस
अनं त्याना महिमा वर्णस; कारण त्याना सर्वा कृत्यं सत्य शेतस; त्याना सर्वा मार्ग
न्याय्य शेतस; जो मानुस घमंडतीन चालस, त्याले तो नम्र करी टाकस.

# 5

## भिंतवरला लिखाण

1 बेलशस्सर राजानी आपला एक हजार सरदारसले मोठी मेजवाणी करी; त्या
हजारसना समक्ष तो द्राक्षरस पिणा.
2 द्राक्षरसना सेवन करी राहिंता तवय नबुखदनेस्सरनी हुकूम करा की, मना बाप
नबुखद्नेस्सर यानी यरूशलेमाधलं मंदिरमाईन जी सोनारूपानं पात्रं आणेल शेतस ती
लई या, म्हणजे मी, मना सरदार, मन्या बायका अनं उपबायका यासले त्यामाईन
द्राक्षरस पिता ई.
3 तवय यरूशलेममाधलं देवना मंदिरना पवित्रस्थानमाईन आणेल सोनानं पात्रं त्या
लिसन वनात; राजा, त्याना सरदार, त्याना बायका अनं उपबायका ह्या त्यानातीन
द्राक्षरस पिनात.
4 त्यासनी द्राक्षरस पिसन सोनं, रूपं, पितळ, लोखंड, काष्ठ अनं पाषाण यासपाईन
घडेल दैवतसना स्तवन करात.
5 त्याच येळले मानवी हातना बोटे प्रगट व्हयनात अनं त्यासनी दिवटनासमोर
राजवाडाना भितना गिलावावर काहीतरी लिखं अनी हातना बोटे लिखी राहिंतात
ती राजाना नजरमा पडना.
6 तवय राजाना तोंड पालटना अनं तो चिताक्रांत व्हयना; त्याना कंबरना सांधा
ढिला पडनात, अनी त्याना गुडघा लटपटू लागनात.
7 राजानी मोठा आवाजमा वरडीन सांगं, की, मांत्रिक, खास्दी अनं दैवज्ञ यासले
लिसन या. राजा त्या बाबेलना ज्ञानीसले बोलना, जो कोणी हाऊ लेख वाची अनं
त्याना अर्थ माले सांगी त्याले जांभळा रंगना कपडा भेटी, त्याना गळामा सोनानं
गोफ घालामा ई अनं तो राज्यमाधला तिन अधिपतीमाधला एक व्हई.

8 मंग राजानं सर्वा ज्ञानी पुरूष वाडामा वनात; पण त्यासले तो लेख वाचता वना
नही अनी त्याना अर्थ राजाले सांगता वना नही.
9 तवय बेलशस्सर राजा भलता चिताक्रांत व्हयना, त्यानी मुद्रा पालटनी अनी
त्याना सरदार घाबरनात.
10 राजा अनं त्याना सरदार यासना शब्द ऐकीन राणी भोजनगृहमा वनी. ती
बोलनी, महाराज, सर्वकाळ जिवत राव्हा, आपली मननी तळमळ व्हवू देऊ नका;
आपण आपलं तोंड उतरू देऊ नका.
11 पवित्र देवना आत्मा ज्यामा शे अस एक पुरूष आपला राज्यमा शे; आपला
बापना कारकीर्दीमा प्रकाश, विवेक, अनं देवना ज्ञानसारखं ज्ञान हाई त्यानाठायी
दखाई वनं; महाराज, आपला बाप नबुखद्नेस्सर राजा यानी त्याले ज्योतिषी, मांत्रिक,
खास्दी अनं दैवज्ञ यासना अध्यक्ष नेमेल व्हतं;
12 कारण उत्तम आत्मा ज्ञान, विवेक, स्वप्नना अर्थ सांगनं, कूट प्रश्न उलगडणं,
कोडी उकलणं, यानासंबंधतीन ज्याले राजानी बेलटशस्सर अश नाव देल व्हतं तो
दानीएल प्रवीण व्हता अस दखाई वनं; तर आते दानीएलले बलाईसन आणा म्हणजे
तो अर्थ सांगी.

## दानीएल लेखना अर्थ सांगस

13 तवय दानीएलले राजानापुढे आणात. राजा त्याले बोलना, मना बाप जो राजा
त्यानी यहूदातीन पकडीन आणेल लोकसपाईन दानीएल तो तूच शे का?
14 मी तुनाबद्दल ऐकेल शे की देवना आत्मा तुना ठायी शे अनी बुध्दी, विवेक
अनं उत्तम ज्ञान हाई तुना ठायी दखाई वनी शे.
15 आते हाऊ लेख वाचीन त्याना अर्थ करीसन माले सांगानं म्हणीन ह्या ज्ञानी
अनं मांत्रिक लोक मनापुढे आणात, पण त्याना अर्थ त्यासले सांगता वना नही.
16 मी तुनाबद्दल ऐकेल शे की, तुले स्वप्नना अर्थ सांगता येस अनं कोडी उकलता
येतस; आते तुले हाऊ लेख वाचता ईसन त्याना अर्थ माले सांगता वना तर तुले
जांभया रंगना कपडा भेटी, तुना गळामा सोनाना गोफ घालामा ई अनी तू राज्यमातीन
तीन्ही अधिपतीमाधला एक व्हशी.
17 तवय दानीएलनी राजाले उत्तर दिधं की, तुना देणग्या तुनाजोडेच राहु दे, तुना
बक्षीस दुसरा कोणले तरी दि टाक, पण मी हाई लेख राजाले वाचाडीन दखाडस
अनं त्याना अर्थ करीसन त्याले सांगस.
18 हे राजा, परात्पर देवनी तुना बाप नबुखद्नेस्सर याले राज्य, महत्व, वैभव अनं
महिमा हाई दिधी;

19 त्यानी त्याले मोठपण दिधा म्हणीन सर्वा लोके, सर्वा राष्ट्रसना अनं सर्वा भाषा
बोलनारा लोके त्यानापुढे थरथर कापत अनं त्याले घाबरेत; वाटी त्याले तो ठार मारे
अनं वाटी त्याले जिवत ठेये; वाटी त्याले तो थोर करे अनं वाटी त्याले तो नीच करे.
20 पुढे त्याना हृदय घमंडी व्हयना, अनं त्याना आत्मा कठोर व्हईन तो
मुद्दामपणतीन वागना तवय त्याले त्याना राज्यपदवरतीन काढामा वना अनं त्याना
वैभव हिराई लेवामा वना;
21 त्याले मनुष्यमाईन काढी टाकामा वना अनं त्याना हृदय पशूनासारखं व्हयना;
तो रानगाढवसमा वस्ती कराले लागना; तो बैलनामायक गवत खाये अनं त्यानं शरीर
आकाशमाधलं दहिवरतीन भिजत राहे. मानवी राज्यवर परात्पर देवनी सत्ता शे अनं
तो त्यावर पाहिजे त्याले स्थापस, अस ज्ञान त्याले व्हसतोपावत तो अश राहिना.
22 हे बेलशस्सरा, तू त्याना पोर्‍या शे. हाई सर्वा तुले ठाऊक राहिसन तू आपला
मन नम्र करात नही;
23 तर स्वर्गना प्रभुबरोबर तू उद्दामपणा करा; त्याना मंदिरमाधलं पात्र तुनापुढे
आणेल शेतस; तू, तुना सरदार, तुनी बायको अनं उपबायको ह्या त्यामाईन द्राक्षरस
पियेल शेतस अनी रूपे, सोनं, पितळ, लोखंड, काष्ठ अनं पाषण यासना घडेल दैवत,
ज्यासले दखास नही, ऐकता येस नही अनं समजस नही, त्यासना तू स्तवन करात;
पण ज्याना हातमा तुना प्राण शे अनं ज्याना स्वाधीन तुना सर्वा व्यवहार शेतस त्या
देवले मान दिधा नही;
24 म्हणीन त्यानी ती हातनी बोटे धाडं अनं हाऊ लेख लिखा.
25 हाऊ लिखेल लेख असा शे: मने, मने, तकेल, ऊफारसीन.
26 याना अर्थ असा: मने म्हणजे देवनी तुना राज्यना काळ मोजीन त्याना अंत
करेल शे.
27 तकेल म्हणजे तुले तागडीमा तोलात पण तू कमी भरनास.
28 परेस म्हणजे तुनं राज्य विभागीसन मेदी अनं पारसी यासले देल शे.
29 तवय बेलशस्सरनी आज्ञा करावर त्यासनी दानीएलले जांभया रंगना कपडा
घालात. त्याना गळामा सोनानं गोफ घालात अनं त्याना संबंधतीन बठीकडे व्दाही
फिराई की हाऊ राज्यमातीन तीन्ही अधिपतीमाधला एक शे.
30 त्यास रातले खास्दीसना राजा बेलशस्सर याना वध व्हयना.
31 अनी दारयावेश मेदी हाऊ जोडेजोडे बासष्ट वरीसना व्हता राजा व्हयना.

# 6

## सिंहना गुहामा दानीएल

1 दारयावेश राजानी आपला मर्जीप्रमाण आपला सर्वा साम्राजमा एकशेवीस
प्रांताधिकारी नेमात;
2 त्यासनावर तीन अध्यक्ष नेमात, दानीएल त्यासनापाईन एक व्हता; राजानं
काही नुकसान व्हवाले नको म्हणीन प्रांताधिकारसनी आपला हिशोब त्या तिन्हीसले
देवानं अस ठरायं.
3 दानीएल त्या अध्यक्षमा अनं प्रांताधिकारीसमा श्रेष्ठ ठरना. कारण त्याना ठायी
उत्तम आत्मा वसी राहिंता; त्याले सर्वा राज्यावर नेमी देवानं अस राजाना ईचार
व्हता.
4 अस व्हतं तवय राज्यकारबारसंबंधतीन दानीएलविरूध्द काही निमित्त शोधाना
प्रयत्न त्या अध्यक्षसनी अनं प्रांताधिकारीसनी चालाडं; पण त्यासले काही निमित्त
किंवा दोष सापडना नही; कारण तो ईश्वासु राहीन त्याना ठायी काही चूक किंवा
अपराध सापडना नही.
5 तवय त्या माणसे बोलनात, हाऊ दानीएलविरूध्द काही निमित्त काढता येवाव
नही पण त्याना देवना नियमसंबंधतीन त्यानाविरूध्द काही निमित्त काढता वनं तर
ते व्हई.
6 मंग ह्या अध्यक्ष अनं प्रांताधिकारी राजाकडे गोया व्हईसन वनात अनं त्याले
बोलनात, दारयावेश महाराज, सर्वकाळ जिवत राव्हा.
7 राज्यमाधला सर्वा देशाध्यक्ष, नायब अधिपती, प्रांताधिकारी, मंत्री अनं सरदार
यासनी असा ईचार करेल शे की अस एक राजाज्ञा व्हवाले पाहिजे, अनं अशी कडक
आज्ञा फिराई जावाले पाहिजे की, हे राजा तीस दिनपावत आपलाशिवाय कोणीबी
देवना किंवा माणुसनी आराधना कोणी करी तर त्याले सिंहना गुहामा टाकानं.
8 तर महाराज, हाई आज्ञा मंजूर करा, फर्मानवर सही करा म्हणजे मेदी अनं
पारसी यासना कधी न पलटनारा कायदाना व्यवस्थाप्रमाणं हाऊ ठराव पलटावू नही.
9 तवय दारयावेश राजानी फर्मानवर अनं आज्ञापत्रवर सही करी.
10 ह्या फर्मावर सही व्हयेल शे असं दानीएलनी ऐकं तवय तो आपला घर गया;
त्याना खोलीन्या खिडक्या यरूशलेमन्या दिशाकडे राहीन उघड्या व्हत्यात; त्यानी
आपला रोजना प्रमाणं दिनमा तीनदावं गुडघा टेकीन प्रार्थना करी अनं आपला देवना
धन्यवाद करा.
11 त्या येळले त्या माणसे गोया व्हईसन वनात तवय तो दानीएल आपला देवनी
प्रार्थना अनं ईनंती करी राहिना शे असं त्यासले दिसनं.

12 तवय त्या राजा जोडे जाईन त्यानी फिरायेल आज्ञाविषय त्याले बोलनात,
महाराज, तीस दिनपावत जो कोणी आपलाशिवाय कोणा देवनी किंवा माणुसनी
आराधना करी त्याले सिंहना गुहामा टाकानं अशी आज्ञा आपण फिरायेल शे ना?
राजानी उत्तर दिधं की, मेदी अनं पारसी यासना न बदलनारा कायद्याप्रमाणं हाई
निश्चित ठरायेल शे.
13 तवय त्या राजाले बोलनात, महाराज, धरी आणेल यहूदीसपाईन तो दानीएल
आपलाले अनं आपण सही करेल आज्ञाले मानस नही; तर तो नेहमी तीनदावं आपला
देवनाजोडे प्रार्थना करस.
14 हाई शब्द ऐकीन राजा भलता खिन्न व्हयना, अनी दानीएलना बचाव कराना
तो ईचार कराले लागना; त्याना बचाव करानं म्हणीन त्यानी सुर्य मावळस तोपावत
प्रयत्न करा.
15 मंग त्या माणसे राजाकडे जमाव करीसन वनात अनं त्याले बोलनात, हे राजा
हाई ध्यानमा आण: मेदी अनं पारसी यासना अशा कायदा शे की, राजानी करेल
आज्ञा किंवा नियम बदलता येवाव नही.
16 त्यानावर राजानी आज्ञावरीन दानीएलले आणीसन सिंहसना गुहामा टाकात.
राजा दानीएलले बोलना, ज्या देवनी तू कायम उपासना करस तो तुले सोडाई.
17 त्यासनी एक दगड आणीसन गुहाना दारवर ठेई; अनी राजानी आपला
मुद्रना अनं आपला सरदारसना मुद्रसना तिनावर शिक्का करात; तो अश करता
की दानीएलना बाबत काहीएक फेरबदल व्हवाले नको.
18 नंतर राजा आपला महालमा गया, त्यानी ती रात उपशमाच काढी;
त्यानासमोर वाद्य आणात नही; त्यानी झोप उडनी.
19 मंग राजा मोठा पहाटमाच उठीन लगेच सिंहना गुहानाजोडे गया.
20 तो गुहानाजोडे दानीएलकडे जाईन शोकना आवाजतीन ओरडीन बोलना, हे
दानीएल, जिवत देवना सेवक, ज्या देवनी उपासना तू कायम करस त्याले सिंहपाईन
तुले सोडवता वन शे का?
21 दानीएल राजाले बोलना, महाराज, सर्वकाळ जिवत राव्हा.
22 मना देवनी आपला देवदूत धाडीसन सिहंसना तोंडं बंद करेल शेतस, त्यासनी
माले काहीच अपाय करात नही; कारण त्या देवनासमोर मी निरपराधी ठरनू; अनं
महाराज आपलाबी मी काही अपराध करात नही.
23 तवय राजा भलता आनंदीत व्हईसन आज्ञा करी की, दानीएलले गुहानाबाहेर
काढा. त्याले गुहाना बाहेर काढावर तो त्याले काही इजा व्हवानं काहीच दखायनं
नही, कारण त्याना आपला देववर भरवसा व्हता.

24 तवय ज्या माणसंसनी दानीएलवर आरोप आणेल व्हता, त्यासले राजानी
आज्ञावरीन धरी आणात अनी त्यासले अनं त्यासना बायका पोर्‍यासले सिंहना गुहामा
टाकात; तवय त्या गुहाना तळनाजोडे पोहचतस तेना अगोदर सिहंसनी सर्वासना
हाडसना चुराडा करात.
25 मंग पृथ्वीवरला सर्वा लोकसले, सर्वा राष्ट्रसले अनं सर्वा भाषा बोलनारा
लोकसले, दारयावेश राजानी अश लिखीसन कळाव की, तुमले शांती भेटो.
26 मी फर्मावस की, मना साम्राजना सर्वा हद्दीमाधला लोकसनी दानीएलना
देवनापुढे थरथर कापीसन त्यानं भय धरानं, कारण तो जिवत देव शे; तो सर्वकाळ
